# ज्योती

**************************************************************************************

ईशान्य ओहायो मराठी मंडळ    भाद्रपद–अश्विन श. १९३७    सप्टेंबर–ऑक्टोबर २०१५    NEOMM Tax ID: 341644989

**************************************************************************************

## कार्यकारिणी २०१५

अध्यक्ष: **शरद वानखडे**

president@neomm.org

उपाध्यक्ष: **मुकुल पांडे**

सचिव: **सुयोग बापट**

secretary@neomm.org

कोषाध्यक्ष: **शिल्पा जोशी**

treasurer@neomm.org

सांस्कृतिक कार्यवाह:

**सुजाता लाखे**

ज्योती संपादक:

**कौस्तुभ लेले**

editor@neomm.org

वेब मास्टर: **विशाल खापरे**

विश्वस्त: **संदीप दीक्षित**

**सुदर्शन साठे**

**हिरा राणे**

***********************

जाहिरातीचे दर

पाव पान $ 25

अर्ध पान $ 50

पूर्ण पान $ 75

दिवाळी अंकाकरता हे दर दुप्पट

***********************

**http://www.neomm.org/**

अध्यक्षांचे बोल,

नमस्कार मंडळी

आपण सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दीक शुभेच्छा. तुम्ही माझ्यावर जी जबाबदारी सोपवली ती यशस्वी रीत्या पार पाडावी यासाठी प्रयत्न करतो व ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

या वर्षाच्या सुरवातीला मी मंडळाचा होईल असे नक्कीच वाटले नव्हते. मंडळाची माजी अध्यक्ष, श्री. जय मसुरेकर यांनी आग्रहाने अध्यक्षपदासाठी विनंती केली आणि मी त्यांच्या शब्दाचा मान राखला. मागच्या वर्षीची कमिटी अस्तीत्वात नसल्याने कमिटीची जबाबदारी कोण घेईल हा प्रश्न होता. परंतू मुकुल, ज्योती, सुयोग, सुजाता, विशाल, कौस्तुभ आणि शिल्पा यांनी मदतीसाठी हीरीरीने हात पुढे केला.

आमच्या कार्यक्रमाला हजर राहून आपल्या प्रतिसादाची अपेक्षा करतो.

धन्यवाद

शरद वानखडे

## आगामी कार्यक्रम

**Annual Picnic:**
**Hinckley Reservation**
**Ledge Lake Shelter A**
**Ledge Road, Between State Road and Kellogg Road**
**Hinckley, OH 44233**
**Aug 22, 2015**

ई.ओ.म.मं. चा गणेशोत्सव



**स्थळ–काळ**

**Parma Snow Public Library Auditorium**
**2121 Snow Road, Parma OH 44134**
**on Saturday Sept 26**

अधिक माहितीसाठी

**http://www.neomm.org/**

*********************

*********************

विशेष दिवस :

ऑगस्ट १: लो. टिळक पुण्यतिथि

ओक्टो. २: म. गान्धी जयन्ती

ऑक्टो. १३: नवरात्रोत्सव

ओक्टो. २२: विजयादशमी – दसरा

नोव्हे. ११: दिवाळी – लक्ष्मीपूजन

नोव्हे. १२: दिवाळी – बलिप्रतिपदा

**सम्पादकीय –**

श्रावण मासी हर्ष मनासी हिरवळ दाटे चोहिकडे ।
क्षणांत सर येते शिरवे क्षणांत फिरुनी ऊन पडे ॥

कविता मनांत रुजली होती. श्रावण महिना सुरु झाला आहे. आपल्या गांवाकडे पावसाळा सुरु आहे आणि इकडे मात्र भर उन्हाळा. तिकडे गणपति उत्सव पावसाळ्यात, तर इथे उन्हाळ्याच्या शेवटी. बस, मनांत विचार येत राहिले. तुलना करीत राहिलो. कदाचित पावसाळा नांवाचा ऋतु इथे नसतोच. म्हटले तर एप्रिल–मे महिन्यांत जास्त पाऊस पडतो, पण पाण्याचा वर्षाव वर्षभर असतो, थंडीत बर्फरूपाने इतकेच. असो. आणखी बरेच लिहायचे मनांत होते, पण एक वेगळाच गंमतीदार प्रकार सांगावासा वाटतो.

याच अंकात ईओममंने साजऱ्या केलेल्या होळी उत्सवाविषयी लेख आहे. लेख इंग्रजीत आहे, छान लिहिला आहे. अवश्य वाचा. या लेखाचे मराठीकरण करायचा प्रयत्न केला गेला. अर्थात विनाकष्ट करायला गूगलची मदत घेतली. मागे केव्हांतरी इथेच जन्मल्या–वाढलेल्या मुलांनां त्याचा उपयोग होईल असे ऐकले होते, पण मनावर घेतले नव्हते. आणि या लेखाच्या निमित्ताने लक्षात आले ती या बाबतीत गूगलची गोलमाल. माझ्या या लेखाची गूगलने काय अवस्था केली असती हे पाहिले नाही, 'होळी' इन्ग्रजी लेखाच्या पहिल्या दोन–तीन वाक्यांची कशी वाट लावली ते पहा.

"It was the much awaited NEOMM's Holi event that finally arrived on March 16th. The venue was Tadka, North Olmsted, OH, our favorite place to meet up due to its central location and awesome food catered by the restaurant. The Marathi folks were looking forward to this 2nd event of year 2015 to catch up and hang around with friends and families."

आणि गूगलीज भाषांतर:

"तो शेवटी मार्च १६ वर आलो त्या किती प्रलंबीत NEOMM च्या होळी कार्यक्रम होता. त्याच्या ठिकाण मुळे मध्यवर्ती स्थान आणि रेस्टॉरंट करून भागविण्यात येत होती छान आहार बनवून वरून फोडणी घालतात, उत्तर Olmsted, अगं, आमच्या आवडत्या ठिकाणी पूर्ण होते. मराठी जाताना वाटेत अप पकडू आणि मित्र आणि कुटुंबियांसह सुमारे स्तब्ध वर्ष 2015 या कार्यक्रमात वाट पाहत होते."

अधिक काय लिहू?

कौस्तुभ लेले

# HOLI

It was the much awaited NEOMM's Holi event that finally arrived on March 16th. The venue was Tadka, North Olmsted, OH, our favorite place to meet up due to its central location and awesome food catered by the restaurant. The Marathi folks were looking forward to this 2nd event of year 2015 to catch up and hang around with friends and families.

The event took off at 3.00 p.m. with a warm welcome from the Marathi Mandal committee and by doing brief introductions. Also, the beautiful weather helped the ladies and gentlemen to get dressed up in traditional colorful attire with stylish open sandals (ladies were craving to do so after 5 months of severe cold). Soon the Holi puja was performed with the scared fire, fresh flowers, coconuts, etc. And Prasad – milk cakes were distributed to everyone. The "gull tikka" was applied to each person's forehead as a symbolic Holi custom. It was then the time to greet each other and interact, which people seemed to enjoy doing. Mouthwatering appetizers such as pakodas and kachoris with tangy chutneys were served hot for the guests with their favorite in-demand masala chai.

The musical orchestra team had arrived by then and was setting up the instruments on the podium. DJ Kris was very active and started entertaining folks with his versatile collection of Indian music. Soft Hindi songs from 80s till date soothed the atmosphere with some nostalgic memories from India. A major portion of the crowd had gathered and assembled till then. It was inspiring to see the senior citizens – the life members of Marathi Mandal to be so enthusiastic and respectful of the event. Their presence definitely demonstrated affability and benevolence. It was also nice to register the young couples and their children who seem to be thoroughly engaged with each other. It was a truly philanthropic event with participation from mixed groups of people.

The musical team posed themselves on the podium to set the tone for the evening. Slowly they commenced the program with a lush variety of Marathi and Hindi poetic notes, gazhals and songs that occupied our minds. Their performance was well received with requests of "once more" to repeat some of the popular verses. Time elapsed quickly in this delightful show and we realized it was already dinner time.

We could smell the delicious Indian food as dinner was served along and immediately people started forming lines to help themselves. Paneer kadhai, veg jalfrezi, biryani, naans, salads was on the menu followed with yummy gulab jamuns and moong dal halwa. Dinner room got busier as people started dining and this opened up for the people to chit chat while they relished the delicacies.

Bollywood songs rang in another hour and the younger folks excitedly jumped to rock the floor. Toddlers, kids, teenagers, adults – everyone got tuned to DJ and danced away to the Holi numbers including "Ranga Barse", "Tune mari pichkari" etc. It was an energetic and exhilarating experience that kept people engrossed for a couple of hours.

Soon it was time to say bye to our friends. We captured our wonderful moments in pictures which were later on uploaded to the NEOMM Facebook page. We look forward to meet our NEOMM friends again and have more fun at our next event.

**Jyoti Sadekar**

॥श्री॥

## नाही कशात गुंतायचे

श्रीराम जय राम जयजय राम ।
स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी ॥
श्रीराम जय राम जयजय राम ।
श्रीराम जय राम जयजय राम ।

माता पित्याची सोनुकली  बाच्या मधली भातुकली ।
आजी नातीची लाडीगोडी  कौमाऱ्यातील फुलवेडी ॥
अधूनच स्मरायची थोडी थोडी, पण नाही कशात गुंतायचे
हळूच त्यातून सटकायच अन् श्रीराम जयराम म्हणायच १

मिळता बक्षिसे विद्यार्जनी कौतक केले आप्तजनी
जग जिंकायची ईर्षा मनी पण नशिबाने देता टोला क्षणी
निराशेतून आशेला जगवायचे
अन् जिद्दीने नशिबाला घडवायच
पण नाही कशात गुंतायचे  हळूच त्यातून सटकायच
अन्  श्रीराम जय राम जयजय राम म्हणायच ! २

यौवनातील आकांक्षा अन् पतीप्रीतीची अभिलाषा
समान हकाची अपेक्षा पण पदरी पडती उपेक्षा
मनीचं खंतावणी झाकायचं
अन् मानाचा तुरा लावून मिरवायचे
पण नाही कशात गुंतायचं
अन् हळूच त्यातून सटकायचं मग
श्रीराम जय राम जयजय राम म्हणायच ! ३

गृहस्थधर्मामध्ये पदार्पण सर्वस्वाचे जणू समर्पण
विवाहबंधनी शिरायचं अन् नशिबावर सर्व कांही सोपवायचं
मिळेल त्यात समाधान मानायचं
अन् आनंदाने जीवन फुलवायचं
कर्तव्य कर्म निभवायचं पण नाही कशात गुंतायचं
हळूच त्यातून सटकायच अन् श्रीराम जयराम म्हणायच ४

आता वंशवृद्धिची वेळ आली,
अन् जीवघेणी यातना अनुभवली
स्त्रीजन्माची कसोटी दिली,
पण बाळाच्या दर्शनाला असुसली
आता त्यागातच जीवन जगायचं
अन् जन्माचं सार्थक मानायचं
पण नाही कशात गुंतायचं
अन् हळूच त्यातून सटकायचं
मग श्रीराम जय राम म्हणावयाच ! ५

आता गृहिणीधर्माचे पालन करी
अतिथ्याचे अवलंबनआबालवृद्धाचे समाधान
करीतच शेगडीपासून देवडीपर्यंत धावायचं
पण केलं केलं असं नाही म्हणायचे
मूकपणे सर्वकांहीं सोसायचं
अन् तटस्थ जीवन जगायचे
पण नाही कशात गुंतायचं
अन् हळूच त्यातून सटकायचं
अन् श्रीराम जय राम म्हणायचं ! ६

आता प्रौढत्वाची जोखीम मुलाबाळांचे संवर्धन
त्यांना मायेच्या बोलीनं गोंजारायचं,
पण शिस्तीच्या धाकाने लोटायचं
सर्वस्व ओतून करायचं, करता करता झिजायचं
अन् झिजल्याचे चीज झाले म्हणायचं,
पण नाही कशात गुंतायचं
अन् हळूच त्यातून सटकायचं
अन् श्रीराम जय राम म्हणायच ७

**सरस्वतीबाई गंगाधर थिटे**

## उसाच्या रसाचे लाडू :

**साहित्य :–**

| | |
|---|---|
| ऊसाचा रस | 1 ग्लास |
| तांदूळाचा रवा | 1 वाटी (तांदूळ भिजवून उपसून त्याला जाडसर वाटा) |
| नारळाचे घट्ट दूध | 1 वाटी |
| वेलची पूड | 1 चमचा |

**कृती :–** तांदूळाचा रवा तांबूस रंगावर भाजून घ्यावा. थंड झाल्यावर त्यात नारळाचे दूध मिसळून पेस्ट तयार करा. त्यानंतर ऊसाचा रस उकळवून थोडा घट्ट करा व त्यात हळूहळू तांदूळाची पेस्ट घाला. मिश्रण सतत ढवळत राहा. गुठळया होऊ देवू नका. थोडे घट्ट झाल्यावर त्याचे लाडू वळा.

## दहीत्री

## साहित्य :

| | |
|---|---|
| कणिक | 1 वाटी |
| मैदा | 1 वाटी |
| आरारोट | 2 चमचे |
| दही | 2 चमचे |
| तूप | तळायला |
| साखरेचा पाक | 2 वाटी |
| बदाम, पिस्ता | पाव वाटी |

कृती :– मैदा, कणिक व आरारोट एकत्र करुन घ्यावा. नंतर गरम पाण्यात 2 चमचे दही घालून मैदा व कणीक भिजवून घ्यावे. हे पीठ कमीत कमी सहा तास भिजवत ठेवावे. नंतर दोन वाटया साखरेचा पाक तयार करुन ठेवा. त्यात आवडीप्रमाणे केशर किंवा गुलाबजल घालावे. त्यानंतर तूप गरम करुन एका पळीने भिजवून ठेवलेले पीठ भज्याप्रमाणे तूपात सोडा. चांगले फुगून वर आल्यावर ते काढूप साखरेच्या पाकात घ ालावे. बदाम, पिस्त्याने सजवून खायला द्यावे.

**5. रव्याचा शिरा**

**साहित्य :–**

| | |
|---|---|
| रवा | 1 वाटी |
| पाणी | 2 वाटया |
| तूप | अर्धी वाटी |
| साखर | 1 वाटी |
| वेलची पावडर | पाव चमचा |
| मीठ | चिमूटभर |
| बदाम, काजू, बेदाण | पाव वाटी |
| केळी | 1 नग |

**कृती :–** प्रथम रवा तूपावर मंद आचेवर चांगला लालसर रंगावर भाजून घ्यावा. दुसऱ्या एका भांडयात पाणी उकळत ठेवून पाणी उकळल्यावर ते पाणी भाजलेल्या रव्यात घालावे. चांगली वाफ येण्याकरीता वरुन झाकण लावून ठेवावे व मिश्रण कोरडे होईपर्यंत परतावे. नंतर त्यात साखर व केळीचे तुकडे घालून मिश्रण एकत्र करावे. साखर घातल्यामूळे ते थोडे पातळ होईल त्याला पुन्हा कोरडे होईपर्यंत परतावे. शेवटी वेलची पावडर, बदाम, काजू, बेदाणे व थोडे तूप घालून गरम गरम खायला दयावे.

**टीप :–** पूर्ण पाणी न वापरता त्यात दूध वापरले तर शिरा स्वादिष्ट होतो.

### 3. गोंदाचे अनारसे

**साहित्य :–**

| | |
|---|---|
| पांढरा गोंद | 1 वाटी (कुटून त्याचा रवा करुन घ्यावा) |
| रवा | 1 वाटी |
| खाण्याचा सोडा | चिमुटभर |
| दही | 2 चमचे |
| खसखस | 4 चमचे |
| तूप | तळायला |
| साखरेचा घट्ट पाक | 1 वाटी |
| दूध | 4 चमचे |

**कृती :–** सर्व प्रथम पांढरा गोंद कुटून त्याचा रवा काढून घ्या. त्यामध्ये गव्हाचा रवा, सोडा मिसळून घ्या. नंतर एक चमचा दही व थोडे दूध घालून याचा गोळा मळून घ्या. नंतर त्यातील लिंबा ऐवढा गोळा घेऊन त्याची पुरी लाटून ती खसखसवर थापा. खसखस लावलेली बाजू वर ठेवून मंद आचेवर अनारचे तळून घ्या. अनारसे तळून झाल्यानंतर त्यावर एक–एक चमचा साखरेचा पाक घाला.

### 4. पनीर पाळे

**साहित्य :–**

| | |
|---|---|
| पनीर | 300 ग्रॅम |
| साखर | 200 ग्रॅम |
| वेलची पावडर | 1 चमचा |
| मीठ | चिमूटभर |
| केशर | पाव चमचा |
| दूध | पाव वाटी |

**कृती :–** पनीरचे आपल्या आवडीनुसार तुकडे करुन ठेवा. साखरेत थोडं दूध व पाणी घ ालून घट्ट पाक बनवून घ्या. पाक उकळायला लागल्यावर त्यामध्ये केशर व पनीरचे तुकडे घाला. त्याला चालवत राहा. हळूहळू ते मिश्रण कोरडे होईल, शेवटी वेलची पावडर घालून खायला दया.

## 8. भोपळयाचे घारगे

**साहित्य :–**

| | |
|---|---|
| लाल भोपळयाचा किस | 1 वाटया |
| गूळ | 1 वाटी |
| तांदळाचे पीठ | 1 वाटी |
| मीठ | चवीनुसार |
| तेल | पाव वाटी |

कृती :– एक वाटी लाल भोपळयाचा किस व एक वाट‌‌‌ किसलेला गूळ एकत्र करुन शिजवून घ्यावे. मिश्रण जरा ओलसर असतानाच त्यात चवीपुरते मीठ व मावेल एवढे तांदळाचे पीठ घालून घट्ट मळून घ्यावे. त्याच्या छोटया गोळया करुन केळीच्या पानांवर हाताने वडे थापावे व गरम तेलात तळून घ्यावेत. गुलाबी रंगाचे खमंग होतात.

ती. गोपाळ मार्तंड देवगांवकर ऊर्फ 'गोविंदानुज' यांनी
इ.स. १९१५ ते १९३३ या कालखंडात रचिलेली वृत्तबद्ध पदे.

y

J



## विश्वदर्शन

(राग : गजल, चाल : मागूनि मिळाले कां)

त्या नंद यशोदेला, गोपाल बाळ साजे।।
ते मूढ जनहि सारे, मानिती बाळसा जे।। १।।
नवनीत चौर्य त्याचे, चोरास लाजवी जे।।
मातेस स्वमुख दावी, विश्वास दाखवी जे।। २।।
भयभीत विनवी माता, स्वरूपास आवरी जे।।
तें बाळरूप दावी, हृदयास तोषवी जे।। ३।।
राधे तुझ्या घरी गे, हे बाळ बहू शोभे।।
तो ब्रह्म तूं हि माया, हा योग अम्हा लाभे।। ४।।

## संसार नैष्फल्य

(राग : केदार, चाल : विफल बोध हो .....)

आवरी सर्व हा प्रेम-प्रसारा। स्वार्थ परायण हा जन सारा।
बळी दिले जरी पुत्रहि दारा। वात्सल्याचा न शिवेचि वारा।। १।।
आप्तजनहि हे, असती सुखाचे। संकटकाळी कुचकामाचे।। २।।
परोपकारी जो रत झाला। मुके पूर्ण तो सर्व सुखाला।। ३।।
पदारविंदी प्रभुच्या भ्रमरा। दंग होऊनी चुकवी फेरा।। ४।।

## भ्रष्टाचार

\- पाण्यात दूध, दुधात पाणी
हीच भ्रष्टाचाराची कहाणी

## पिंडावरचे कावळे



काव काव काव करीत उडाले सगळे कावळे
त्या मृतात्म्याच्या पिंडाजवळून,
(कारण) दिसत होता त्या काकाक्षाला,
अतृप्त आशेचा एक किरण ।। १ ।।

निराधार वृद्धाच्या पिंडदेहाच्या व्यथेतून
झिरपत होता एक आशेचा किरण
येईल काहो पुन्हा, खाकीतला तो पोष्टमन,
मनिऑर्डर घेऊन? ।।२ ।।

वाट पाहून पाहून थिजलेला तो मृतदेह,
शिणवत होता आपला सूक्ष्मदेह,
एका वेड्या आशेपोटी, कारण -
फेडायचे होते त्याला,
जगण्यासाठी घेतलेले ऋण ।। ३ ।।

काव काव काव कावळ्यांचा थवा पुन्हा आला त्या पिंडापाशी,
पण उधळला पुन्हा, त्याला पाहून
येत होता एक दारुड्या झोकांड्या देत,
परतत होता तो ऑफिसमधून घराकडे ।। ४ ।।

चढवली होती त्याने, अशाच एका निराधाराच्या पेन्शनमधून
अन् पेटली होती आग, त्याच्या कुजलेल्या
आतड्यांच्या पेकाटात ।। ५ ।।

डॉ. शशीशेखर देवगावकर

# अधोगती

धावतो पुढे जरी
पोहचलो मागुती
उमजेना धावतो का
परि सारे धावती ।।

शत्रू उभा जागोजागी
कट्यार त्याच्या हाती
शहीद होणार कोण
आम्ही शोधतो सभोवती ।।



सडती राज्यगोदामी
अगणीत धान्याची पोती
शेतकरी लावतो गळफास
हीच आमची प्रगती ।।

एक गोष्ट आनंदाची
आम्ही बुडलो इतके खालती
आता याहूनही अधिक
काय होईल अधोगती ।।

डॉ. मिलींद देवगावकर

छायाचित्रे सौजन्य: शरद वानखडे

# *Traveler*



*Going from place to place,*
*I have become learned.*
*Many a thing, with grace,*
*I have earned.*

*The distance from one place to another*
*Is immeasurable 'cause,*
*Wherever I go, I have a brother*
*Or sister waiting with open arms.*

*Sure, there have been battles and wars,*
*Out of greed they have been fought,*
*As long as we know that hatred cowers,*
*In front of good, then good is what we got.*

*I travel without a home,*
*I travel without a family,*
*'Cause the world is my home,*
*And everyone in it, my family.*

*I am not an Indian, American,*
*Russian, Greek, nor French*
*I am an inhabitant of this earth,*
*Forgotten to time, discarded in the trench.*

Mayank Deogaokar